**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक २५९/२०१३ मधील</u>**
**<u>अर्ज (निशाणी क्रमांक ७८) वरील आदेश</u>**
(सीएनआर क्र.एमएचएएच०८-००३८१०-२०१४)

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.७ याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम २ अन्वये वादी विरूद्ध तुर्तातुर्त मनाई आदेश मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र.७ चे अर्जातील कथन थोडक्यात असे :- प्रतिवादी क्र. ६ व ७ यांनी प्रतिदावा दाखल केला आहे, तसेच त्यामध्ये मनाई हुकुमाचा अर्ज देखील दाखल केला आहे. दावा मिळकतीपैकी रस्त्यालगतचे उत्तरेकडील ०.११ हे.आर व ख. ०.१२ हे.आर मिळकत प्रतिवादी क्र. ७ यांची खरेदी मालकीची मिळकत असुन ती त्यांचेच कब्जेवहिवाटीत आहे, त्या मिळकतींशी वादींचा कोणताही संबंध नाही. सदरची मिळकत प्रतिवादी क्र. ७ यांनी दिनांक ०९/०५/२०१७ रोजी प्रतिवादी क्र.६ याचेकडुन नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केली आहे, त्याअन्वये सदर मिळकतीच्या महसुल अभिलेखसदरी त्याचेच नावाची नोंद झाली आहे. सदर खरेदीखताला वादींनी दाव्यामध्ये आव्हानीत केलेले नाही.

०३. प्रतिवादी क्र.७ पुढे असे कथन करतो की, त्याने खरेदी घेतलेल्या क्षेत्राशी वादीचा कसलाही संबंध नाही तरी परंतु ते सदर क्षेत्राचे मालकीबाबत व कब्जाबाबत सदर प्रतिवादीशी वाद घालत आहेत. प्रतिवादी क्र.७ हे दावा मिळकतीपैकी त्यांचे खरेदी मालकीचे क्षेत्र ०.११ हे. आर. व ०.१२ हे. आर. स्थित असलेल्या मंगळापुर, ता. संगमनेर या गावापासुन ६ ते ७ कि.मी. अंतरावर संगमनेर शहर हद्दीमध्ये रहात असुन मंगळापुर येथे येवुन जावुन करत आहे. वादी क्र.२ याने त्याचे दोन्ही मुलांसह दिनांक १५/१२/२०२२ रोजी सदर प्रतिवादीच्या मालकीच्या उपरोक्त नमुद मिळकतीमध्ये प्रवेश करून टपरी टाकण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी त्याने वादींकडे त्याबाबत विचारणा केली व टपरी टाकु नका असे सांगितले परंतु वादींनी प्रतिवादी क्र.७ यांस शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली तसेच त्याचेविरूध्द जातीवाचक शिवीगाळ केली म्हणुन गुन्हा दाखल करण्याची देखील धमकी दिली.

०४. प्रतिवादी क्र.७ पुढे असे कथन करतो की, त्याने संगमनेर शहर पोलिस ठाणे येथे दिनांक १७/१२/२०२२ रोजी वादी क्र.२ व त्याचे दोन्ही मुलांविरूध्द भा.दं.वि. कलम ५०४, ५०६ अन्वये फिर्याद दाखल केली, त्यानुसार अदखलपात्र गुन्हा क्र.१९३२/२०२२ हा दाखल केला होता. पोलिसांनी वादी क्र.२ व त्याचे मुलांना चौकशीकरीता बोलावले होते

त्यावेळी त्यांनी प्रतिवादी क्र.७ चे क्षेत्रामध्ये टपरी टाकणार नाही तसेच हरकत अडथळा करणार नाही असे कबुल केले होते. दिनांक २१/१२/२०२३ रोजी प्रतिवादी हा दावा मिळकतीपैकी त्याचे खरेदी मालकीचे क्षेत्राची पाहणी करण्यासाठी गेला असता वादी क्र.२ व ४ तसेच वादी क्र. २ चा मुलगा यांनी सदर क्षेत्रामध्ये बेकायदेशीररित्या डंपरने माती व मुरूम टाकत असल्याचे तसेच टपरी टाकण्याचा प्रयत्न करत असल्याचे निदर्शनास आले, त्यावेळी देखील त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी त्याला जातीवाचक शिवीगाळ केली म्हणुन फौजदारी केस दाखल करण्याची धमकी दिली.

०५.　　　　प्रतिवादी क्र.७ पुढे असे कथन करतो की, जर वादींनी सदर प्रतिवादीच्या खरेदी मालकीच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण केले, बळजबरीने टपरी टाकण्याचा प्रयत्न केला तर नुकसान सदर प्रतिवादीचे होणार आहे त्यामुळे वादींनी सदर प्रतिवादीच्या खरेदी मालकीच्या मिळकतीचा कब्जा घेण्याचा प्रयत्न करू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश वादी क्र.२ व ४ तसेच वादी क्र.२ चा मुलगा सुरज यांचेविरूध्द देण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र.७ याने केली आहे.

०६.　　　　वादी क्र.२ व ४ यांनी प्रतिवादी क्र.७ च्या सदर अर्जास **नि.क्र.८९** वर म्हणणे दाखल करून सक्त हरकत नोंदवली आहे. वादीं त्यांचे म्हणणेमध्ये असे कथन करतो की, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी दावा मिळकत व इतर मिळकतींबाबत नियमित दिवाणी दावा क्र. ४१९/१९९८ हा वाटपाकरीता दाखल केला होता, तो दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी चुकीच्या चतु:सिमा नमुद करून प्रतिवादी क्र.६ यांस क्षेत्र खरेदी दिले. उत्तरेकडील ज्या क्षेत्राबाबत प्रतिवादी तक्रार करत आहेत ते क्षेत्र कधीही प्रतिवादी क्र.१ ते ५ यांचे कब्जात नव्हते, त्यामुळे तसे खरेदीखत करून देण्याचा त्यांना कोणताही अधिकार नव्हता. प्रतिवादी क्र.६ यांना सदर मिळकतीचा ताबा मिळालेला नाही त्यामुळे प्रतिवादी क्र.७ यांना ताबा मिळण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. प्रतिवादी क्र.६ याने प्रतिवादी क्र.७ यांचे नावे दिनांक ०९/०५/२०१७ रोजी जे खरेदीखत करून दिले ते खरेदीखत बिनकब्जाचे होते.

०७.　　　　वादी क्र.२ व ४ पुढे असे कथन करतात की, सदरचा दावा त्यांनी सन २०१३ मध्ये दाखल केला आहे, तसेच दावा प्रलंबित असल्याची नोटीस दिनांक २५/०३/२०१३ रोजी दिलेली आहे, त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.६ व ७ यांना देखील नोटीसा प्राप्त झाल्या आहेत.

अशी परिस्थिती असतांना प्रतिवादी क्र.७ याने प्रतिवादी क्र.६ यांचेकडुन दिनांक ०९/०५/२०१७ रोजी तथाकथित खरेदीदस्त लिहुन घेतला व त्या बेकायदेशीर खरेदीखताद्वारे वादींचे वडीलोपार्जित मालकीचे मिळकतीमध्ये हक्क सांगत आहेत. स.नं.४२/३ चा नविन स.नं. ४२/५ पैकी कोल्हार-घोटी मार्गालगत दक्षिण बाजुकडील २३ गुंठे क्षेत्र बाबु रामा वैराळ यांचे स्वतंत्र मालकीचे होते, त्यापैकी १० गुंठे क्षेत्र सन १९८४ मध्ये बिगर शेती केलेले होते, तशी नोंद फेरफार नं.३२०० प्रमाणे सन १९८७ मध्ये घेण्यात आलेली आहे. मयत बाबु वैराळ यांचे मिळकतीबाबत त्यांचे वारस वादी क्र.१ ते ५ यांनी संगमनेर न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र.४०/२००३ दाखल केला होता.

०८. वादी क्र.२ व ४ पुढे असे कथन करतात की, नियमित दिवाणी दावा क्र. ४०/२००३ मध्ये हुकुमनामा होवुन त्या हुकुमनाम्याची अंमलबजावणी झाली व बाबु वैराळ यांचे वारसांमध्ये मा. जिल्हाधिकारी यांनी वाटप करून दिलेले आहे, तसा वाटपाचा नकाशा कायम करण्यात आला आहे तो निशाणी क्र.४७ वर दाखल केला आहे. नियमित दिवाणी दावा क्र.४०/२००३ या दाव्यात वादी क्र.१ ते ५ यांना जे क्षेत्र वाटपाने आले त्या रस्त्यालगतचे क्षेत्रावर प्रतिवादी क्र.७ हा हक्क सांगत आहे व तो बेकायदेशीरपणे कब्जा मिळविण्याचा प्रयत्न करत आहे. प्रतिवादी ज्या क्षेत्रासाठी तक्रारी उपस्थित करत आहे ते क्षेत्र वादींचे वडीलोपार्जित असुन न्यायालयाच्या हुकुमनाम्याने वाटप कायम करण्यात आले आहे, त्यामध्ये त्यांच्या कुटुंबाच्या वस्त्या, बोअरवेल, ३ फेज कनेक्शन आहे.

०९. वादी क्र.२ व ४ पुढे असे कथन करतात की, हुकुमनाम्यान्वये वादी क्र.२ यांचे हिश्श्यास जे क्षेत्र आलेले आहे त्या क्षेत्रास रस्त्यालगत सुमारे एक वर्षापुर्वी हॉटेल आरोही या नावाने हॉटेल व्यवसाय सुरू केला आहे, तसेच वादी क्र.३ ते ५ यांचे हिश्श्यास आलेल्या मिळकतीमध्ये वादी क्र.४ यांनी शेडचे काम पुर्ण केलेले आहे. अशी वस्तुस्थिती असतांना प्रतिवादी क्र.७ यांनी दिनांक १५/१२/२०२२ व २१/१२/२०२३ रोजी काल्पनिक घटना नमुद करून अर्ज केलेला आहे. प्रतिवादी क्र.७ हा राजकिय क्षेत्रातील व्यक्ती असुन त्याने पदाचा गैरवापर करून बेकायदेशीर खरेदीखताद्वारे नोंद करून घेतली आहे, त्या नोंदीविरूद्ध वादींने अपील दाखल केलेले असुन ते मंत्रालयात प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र.७ याने दावा प्रलंबित असतांना मालमत्ता खरेदी केली आहे, तो स्वच्छ हाताने न्यायालयासमक्ष आलेला

नाही, त्यामुळे तो तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेस पात्र नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती वादींनी केली आहे.

१०. वादीं व प्रतिवादी क्र.७ यांच्या परस्पर विरोधी कथनावरून खालीलप्रमाणे मुद्दे माझे विचाराधीन येतात त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमुद केले आहेत :-

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. प्रतिवादी क्र.७ यांना प्रथम दर्शनी केस आहे, असे त्यांनी सिद्ध केले आहे काय ? | ... नकारार्थी. |
| २. न्यायाचा तराजु कोणाच्या बाजुने झुकलेला आहे काय ? | ... वादींच्या. |
| ३. अपरिमित नुकसान कोणाचे होणार आहे काय ? | ... वादींचे. |
| ४. आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ४ करीता** :-

११. मुद्दा क्र.१ ते ४ एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती होवुन नये म्हणुन ते एकत्रीत चर्चिले आहेत.

१२. प्रतिवादी क्र.७ तर्फे युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.७ यांनी संगमनेर शहर पोलिस ठाणे येथे दाखल केलेल्या अदखलपात्र गुन्हा क्र.१९३२/२०२२ ची छायांकित प्रत **नि. क्र.८१** सोबत दाखल केली आहे, तसेच **नि.क्र.९१** सोबत स.नं. ४२/५ चा संगणकीय ७/१२ उतारा, स.नं. ४२/५ पैकी ०.११ हे. आर. + ख. ०.१२ हे. आर. इतक्या क्षेत्राचे प्रतिवादी क्र.६ यांनी प्रतिवादी क्र.७ यांचे लाभात करून दिलेल्या नोंदणीकृत खरेदीखताची छायांकित प्रत, प्रतिवादी क्र.७ यांनी प्रतिवादी क्र.६ याचेकडुन तिच मिळकत खरेदी केल्याबाबतच्या खरेदीखताची छायांकित प्रत, मंडळाधिकारी यांचेकडील तक्रार केस नं. ८९/२०१७ मधील दिनांक १०/११/२०१७ रोजीच्या निकालाच्या सुचनापत्राची प्रत, तहसिलदार यांचेकडे दाखल केलेल्या तक्रार अर्जाची छायांकित प्रत, तहसिल कार्यालय यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियमान्वये माहिती मिळणेबाबत दाखल केलेल्या अर्जाची

संबंधीत कार्यालयाची पोहोच असलेली प्रत, तहसिल कार्यालय यांनी मंडळाधिकारी, संगमनेर यांना प्रतिवादी क्र.६ यांच्या अर्जाची चौकशी करणेबाबत दिलेल्या पत्राची साक्षांकित प्रत, मंडळाधिकारी यांनी तहसिलदार, संगमनेर यांना दिनांक ०५/०१/२०२४ रोजी पाठविलेल्या पत्राची साक्षांकित प्रत, अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडील दुसरे आर.टी.एस. अपील क्र.६३८/२०१५ मधील निकालपत्राची छायांकित प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

१३. वादींतर्फे **नि.क्र.९३** सोबत मालमत्ता हस्तांतरण कायदा कलम ५२ प्रमाणे दिलेल्या नोटीसची मुळ प्रत, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडे रक्कम रूपये १,०५०/- चे घराचे देयक, रक्कम रूपये १,४२,१७०/- ची बोअरवेलची बिल पावती, रक्कम रूपये ४७०/-, २,७१०/- घराचे बिल, मंगळापुर येथील घर मिळकत क्र.५८० चे सन २०११ ते सन २०१४-२०१५, घर मिळकत क्र.८६ चे सन २०१५-२०१६, घर मिळकत क्र.८५ चे सन २०१५-२०१६ ते २०१८-२०१९, घर मिळकत क्र.१६९ चे सन २०२३-२०२४ चे व २०२७-२०२८ चे कर आकारणी उतारे इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

१४. प्रतिवादी क्र.६ व ७ तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वादींनी सदरचा दावा मनाई आदेशाकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.६ व ७ यांनी सदर दाव्यामध्ये प्रतिदावा दाखल केला आहे, त्यामध्ये प्रतिवादींनी दावा मिळकतीपैकी उत्तरेकडील ०.११ हे. आर. + ख. ०.१२ हे. आर. या क्षेत्रामधील प्रतिवादी क्र.७ यांचे कब्जेवहिवाटीस वादींनी हरकत अडथळा करू नये असा निरंतर मनाई आदेश दयावा अशी मागणी केली आहे. प्रतिवादी क्र.७ यांनी प्रतिवादी क्र.६ यांचेकडुन प्रतिदाव्यामध्ये नमुद केलेली मिळकत खरेदी केली आहे, तेव्हापासुन त्यामध्ये त्याचाच ताबे कब्जा आहे. वादींनी प्रतिवादी क्र.७ याने खरेदी केलेल्या मिळकतींमध्ये टपरी टाकण्याचा प्रयत्न केला, तसेच दिनांक ३१/१२/२०२३ रोजी वादी क्र.२ व ४ यांनी त्या मिळकतींमध्ये मुरूम आणुन टाकला. प्रतिवादी क्र.७ यांनी वादींविरूध्द दिनांक २२/१२/२०२३ रोजी तक्रार दाखल केली आहे. दिनांक ०९/०५/२०१७ रोजीचे खरेदीखत दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र.७ यांनी प्रतिवादी क्र.६ यांचेकडुन करून घेतले आहे.

१५. प्रतिवादी क्र.६ व ७ तर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, तक्रार केस नं.८९/२०१७ मधील आदेशान्वये प्रतिवादी क्र.७ चे नावाची नोंद केली तसा फेरफार देखील प्रतिवादींनी दाखल केला आहे. तक्रार केस नं.८९/२०१७ मधील आदेशाला वादींनी कोठेही आव्हानीत केलेले नाही, इतकेच नव्हे तर त्यांनी दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.७ विरूध्द दाद मागितलेली नाही. दावा मिळकत ही नियमित दिवाणी दावा क्र.४०/२००३ मधील हुकुमनाम्याने वादींनी आपसांत वाटप करून घेतली होती परंतु त्या वाटपाला प्रतिवादी क्र.५ ते ७ पक्षकार म्हणुन सामील नव्हते. स.नं.४२/३ ही प्रतिदाव्यामधील मिळकत आहे. प्रतिवादी क्र.७ हा दावा मिळकतीचा खराखुरा खरेदीदार आहे.

१६. वादींतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, प्रतिवादी क्र.७ यांनी तुर्तातुर्त मनाई आदेशाची मागणी केली आहे त्यामुळे त्यांनी त्याचा दावा मिळकतीमधील ताबा सिध्द करणे गरजेचे आहे केवळ खरेदीखत आहे म्हणुन कब्जा आहे असे म्हणता येणार नाही. दावा मिळकतीच्या ओळखीबाबत वादींनी वाद उपस्थित केला आहे. दावा मिळकत निश्चित कोठे आहे याचा बोध होत नाही. याकामी वादींनी नकाशा देखील दाखल केला आहे. वादींचे पुर्वज बाबु वैराळ यांनी प्रतिदाव्यातील मिळकत खरेदी करून घेतली होती त्यापैकी १० गुंठे बिगर शेती करून घेतली होती. नियमित दिवाणी दावा क्र.४०/२००३ मधील वादीं व प्रतिवादीं हे प्रस्तुत दाव्यात वादी आहेत. १० गुंठे क्षेत्र बिगर शेती करून घेतल्याबाबतचा फेरफार क्र. ३२०० हा नि.क्र.८८ सोबत दाखल केला आहे.

१७. वादींतर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, जी बिगरशेती मिळकत आहे तिच मिळकत प्रतिवादी क्र.७ याची आहे असे त्याचे म्हणणे आहे परंतु न्यायालयाच्या वाटपाप्रमाणे फेरफार क्र.४०९९ अन्वये ती मिळकत वादींचे हिश्श्याला आलेली आहे. पुर्वीचा स.नं.४२/३ व हल्लीचा स.नं.४२/५ चे वर्णन १० गुंठे क्षेत्राच्या पुर्वेला मंगळापुर रस्ता दाखवला आहे. ज्या मिळकतीवर प्रतिवादी क्र.७ हक्क सांगत आहे ती मिळकत वादींना सन २०१० मध्ये मिळालेली आहे, तसा फेरफार देखील मंजुर झाला आहे. दावा मिळकतीमध्ये वादींचा ताबा आहे.

१८. वादींतर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, वामन वैराळ यांचे वारसांकडुन प्रतिवादी क्र.६ याने मिळकत खरेदी केली. नि.क्र.४५ सोबत खरेदीखत दाखल

केले आहे. वामन वैराळ याला वाटपाने दुसरीकडे क्षेत्र दिले होते. नि.क्र.४५ वर नियमित दिवाणी दावा क्र.४१९/१९९८ मधील नकाशा दाखल केला आहे, त्यामध्ये स.नं.४२/३ चे क्षेत्र ३५ गुंठे दर्शविले आहे. सन १९९८ मध्ये सदर मिळकतीमध्ये प्रभाकर याचा ताबा नव्हता असे दिसुन येते. नियमित दिवाणी दावा क्र.४१९/१९९८ हा दिनांक १४/१२/२०१६ रोजी काढुन टाकण्यात आला. प्रभाकर याचा दावा रद्द झाला त्यामध्ये त्याने प्रस्तुत प्रतिदाव्यातील नमुद केलेली मिळकत समाविष्ट केली होती. प्रभाकर याचेकडे सदर मिळकतीचा ताबा नव्हता त्यामुळे तो प्रतिवादी क्र.६ कडे जाण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

१९.		वादींतर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, दिनांक १३/०३/२०१३ रोजी प्रभाकर याने प्रतिवादी क्र.६ चे लाभात खरेदीखत करून दिले व त्याच दिवशी प्रतिवादी क्र.६ याने प्रतिवादी क्र.७ चे नावे साठेखत लिहुन दिले. महसुल अभिलेखातील नोंदी या मालकी हक्क दर्शवित नाहीत. प्रतिवादी क्र.६ व ७ हे दिनांक २८/०३/२०१३ रोजी हजर झाले व त्यांनी कैफियत दाखल केली आहे. वादींनी दावा प्रलंबित असतांना दावा मिळकत हस्तांतरीत करू नये अशी नोटीस दि.२५.०३.२०१३ रोजी दिलेली आहे. प्रतिवादी क्र.७ यांनी कैफियत दि.२८.०३.२०२० रोजी दाखल केली आहे. जर मिळकत त्याच्या मालकीची असती तर त्याने कैफियत लगेचच दाखल केली असती. वादींनी याकामी विजबिले दाखल केली आहेत. सर्व्हे नं.४२/५ मध्ये वादींचे हॉटेल आहे तसेच त्यांची सामाईकात घरे देखील आहेत, त्यांनी सदर घरांची छायाचित्रे दाखल केली आहेत.

२०.		वादींतर्फे पुढे असा युक्तिवाद करण्यात आला की, प्रतिवादी हे स्वच्छ हाताने न्यायालयासमक्ष आलेले नाहीत. सदर दावा दाखल असतांना प्रतिवादी क्र.७ याने खरेदीखत करून घेतलेले आहे त्यामुळे चुकीची व्यक्ती न्यायालयाकडुन मदत मागु शकत नाही. दि. १५.१२.२०२२ रोजी टपरी टाकण्याचा प्रयत्न केला असे प्रतिवादींचे म्हणणे आहे परंतु सदरचा अर्ज हा दि.२१.१२.२०२३ रोजी दाखल केला आहे त्यामुळे त्याचा निष्काळजीपणा दिसुन येतो. जर प्रतिवादी हे त्यांच्या हक्काबाबत जागृत असते तर त्याने लगेचच अर्ज दाखल केला असता.

२१.		दोन्ही बाजुंच्या युक्तिवादावरून व दाखल कागदपत्रांवरून असे दिसुन येते की, वादींनी सदरचा दावा निरंतर मनाई आदेशाकरीता दाखल केला आहे तसेच प्रतिवादी क्र.६

व ७ यांनी प्रतिदावा देखील निरंतर मनाई आदेशाकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.६ व ७ यांच्या म्हणण्याप्रमाणे, सदर दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.६ यांनी प्रभाकर याच्याकडुन खरेदी घेतली होती त्यानंतर प्रतिवादी क्र.७ यांनी ती मिळकत प्रतिवादी क्र.६ यांच्याकडुन खरेदी घेतली आहे. सदरचे नोंदणीकृत खरेदीखत दाखल केले आहे परंतु वादींच्या म्हणण्याप्रमाणे, सदरची मिळकत ही त्यांना नियमित दिवाणी दावा क्र.४०/२०१३ मधील हुकूमनाम्यान्वये मिळालेली आहे तसेच त्यामधील १० गुंठे क्षेत्र त्यांनी बिगरशेती देखील करून घेतलेले आहे व त्यामध्ये त्यांचीच कब्जे वहिवाट आहे. याकामी वादी व प्रतिवादींनी दाखल केलेल्या दावा मिळकतीच्या प्रतिवादी क्र.६ व ७ यांच्यामध्ये झालेल्या खरेदीखताचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरचे खरेदीखत हे नोंदणीकृत खरेदीखत आहे त्यामध्ये सर्व्हे नं.४२/५ मधील ०.११ हे. आर. व खराबा ०.१२ हे. आर. इतकी मिळकत प्रतिवादी क्र.६ यांनी प्रतिवादी क्र.७ यांना विक्री केली असे प्रथम दर्शनी दिसुन येते.

२२.        सदर खरेदीखतामध्ये सदर दावा मिळकतीचा ताबा दिल्याचे देखील नमुद केलेले आहे परंतु वादींच्या म्हणण्याप्रमाणे, सदर दावा मिळकतीमध्ये त्यांचा ताबे कब्जा आहे ती मिळकत त्यांना नियमित दिवाणी दावा क्र.४०/२००३ मधील हुकूमनाम्यान्वये मिळालेली आहे. सदर दावा मिळकत ही वाटपाने मिळाल्याबाबतची बाब पुरावा अभिलेखावर आल्यानंतर स्पष्ट होणार आहे. आजमितीला दावा मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत अभिलेखावर दाखल आहे, त्यामध्ये कब्जा दिल्याची बाब देखील नमुद केलेली आहे त्यामुळे ते दुर्लक्षित करता येणार नाही.

२३.        वादींनी, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.७ यांच्या लाभात झालेले खरेदीखत बेकायदेशिर आहे असा कोणताही जाहीर ठराव मागितलेला आहे तरी परंतु प्रतिवादी क्र.७ याने सदरचे खरेदीखत दावा प्रलंबित असतांना केलेले आहे ही बाब देखील दुर्लक्षित करता येणार नाही. जरी प्रथम दर्शनी दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.७ याचा ताबा आहे असे नोंदणीकृत खरेदीखतानुसार दिसुन येते तरी परंतु सदर प्रतिवादींनी तुर्तातुर्त मनाई आदेशाच्या अर्जामध्ये केलेली मागणी ही त्याने प्रतिदाव्यामध्ये मुख्य मागणी म्हणुन देखील केलेली आहे, त्यामुळे दाव्याच्या या टप्प्यामध्ये तुर्तातुर्त मनाई आदेशाची मागणी मंजुर केल्यास प्रतिदाव्यामधील मुख्य मागणी पुरावा न घेता मंजुर केल्यासारखे होईल. दावा मिळकतीच्या ओळखीबाबत

वादींनी देखील आक्षेप नोंदवलेला आहे. अशा परिस्थितीत, दावा मिळकतीची अचुक स्थिती कोठे आहे याचा बोध होत नाही तो पर्यंत कोणत्याही एका पक्षकाराच्याविरूद्ध तुर्तातुर्त मनाई आदेश देणे न्यायोचित होणार नाही असे मला वाटते. वरील सर्व कारणांस्तव, प्रतिवादी क्र.७ मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई आदेश मिळण्यास पात्र ठरलेला नाही त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष मी त्या त्या प्रमाणे नोंदवले आहेत व मुद्दा क्र.४ करीता सविस्तर आदेश खालीलप्रमाणे पारीत करीत आहे :-

**<u>आदेश</u>**

सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येत आहे.

BABAR SANGITA PUNDLIK

Digitally signed by BABAR SANGITA PUNDLIK
Date: 2024.03.06 16:16:31 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- ०६.०३.२०२४.

(श्रीमती. एस. पी. बाबर)
३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.